झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६

जा.क्र. झोपुप्रा/सप्रा१/विशालनगर/१०१०/२०२०

दिनांक :१५ /१० /२०२०

# प्राथमिक पात्रता यादीचे जाहीर प्रकटन

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे" या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांनी पुणे महानगरपालिका क्षेत्रातील गाव मौजे हडपसर स.नं.१३, विशालनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुर्ण झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी क्र.०५/२०२०, दि.०१/०१/२०२० अन्वये प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटन प्रसिध्द केलेले आहे; आणि

ज्याअर्थी, या प्रकटनास अनुसरुन शासनाच्या निर्णय व आदेशान्वये उक्त झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची यादी तयार करणेत आली असुन, झोपडीधारकांना त्यांची निवासी / बिगरनिवासी/ संयुक्त पात्रता निश्चित करणेसाठी जोडपत्र-३/४ व पुराव्यांसह कागदपत्रे सादर करणेबाबत कळविणेत आले असुन, सदरच्या झोपडीधारकांचे उक्त जोडपत्र व पुराव्यांसह कागदपत्रे प्राधिकरणांस प्राप्त झाले आहेत;

त्याअर्थी, प्राप्त झालेले जोडपत्र व त्यासोबतचे प्रपत्र आणि पुराव्यांची छाननी करुन खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या पुणे महानगरपालिका क्षेत्रातील गाव मौजे हडपसर विशाल झोपडपट्टी या पुर्ण २३४९.५७ चौ.मी. अंदाजे क्षेत्रातील झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी व परीशिष्टाचा गोषवारा तयार करण्यात आला असुन, सदरची यादी गोषवाऱ्यासह या जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

या प्राथमिक पात्रता यादीबाबत हित संबंध असलेल्या व्यक्तींनी त्यांची हरकत / दावा /सूचना / आक्षेप लेखी स्वरुपात व योग्य पुराव्यांसह सदरचे प्रकटन प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे मुथ्था चेंबर्स ll, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६ या ठिकाणी दाखल करावी. अशा प्रकारे दाखल करणेत आलेल्या हरकती/ दावे/ सूचना / आक्षेप बाबत संबंधितांना आवश्यक असल्यास वाजवी म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. अर्जदाराचे म्हणणे व पुराव्यांची पडताळणी करुन तसेच आवश्यक तर स्थळपहाणी करून सदरची प्राथमिक पात्रता यादी अंतिम करणेत येईल.

अशाप्रकारे अंतिम करणेत आलेली पात्रता यादी विहीत पध्दतीने प्रसिध्द करणेत येईल. या यादीमध्ये समावेश असलेल्या कोणत्याही नावाबाबत कोणताही आक्षेप असलेस तो पुराव्यासह संबधित उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करता येईल. उपरोक्त अंतिम पात्रता यादीमध्ये अपात्र असणाऱ्या झोपडीधारकास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५(१) अन्वये मा.सचिव, झो.पु.प्रा., पुणे यांचेकडे यादी प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत पात्रतेकरीता प्रथम अपील दाखल करता येईल. मा.सचिव, झो.पु.प्रा., पुणे यांचेकडून प्रथम अपिलावर निर्णय देण्यात आल्यानंतर उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३५(१अ) अन्वये निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. विभागीय तक्रार निवारण समिती, जुने विधान भवन, पुणे यांचेकडे पात्रतेकरीता द्वितीय अपील दाखल करता येईल. पात्रते संबंधात मा.विभागीय तक्रार निवारण समिती यांनी दिलेला निर्णय अंतिम राहिल.

<u>अनुसूची</u>

झोपडपट्टीचे नाव :- विशालनगर (पुर्ण)
महानगरपालिकेचे नाव :- पुणे

| गाव | स.नं. | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत:/ अंशत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|
| मौजे हडपसर | स.नं.१३ | पूर्ण २३४९.५७ चौ. मी. अंदाजे | पुर्वेस - शांतीनगर झोपडपट्टी<br>पश्चिमेस - डवरी वस्ती<br>दक्षिणेस - कालवा<br>उत्तरेस - स.नं.१३ पै. | एकुण झोपडयांची संख्या - ८८<br>एकुण निवासी - ७७<br>पात्र निवासी -१३, अपात्र निवासी - ६४<br>एकुण बिगरनिवासी - ०१<br>पात्र बिगरनिवासी -०, अपात्र बिगरनिवासी -०१<br>एकुण संयुक्त - ००<br>पात्र संयुक्त - ०, अपात्र संयुक्त - ००<br>बंद घरे - १०<br>एकुण इतर बांधकामे (सार्वजनिक / मंदिर / शौचालय / समाजमंदिर) - ०० |

स्थळ:- झो.पु.प्रा. पुणे
दि. १५/१० /२०२०

उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे